दैनिक
# महावृत्त
E-Mail:dainikmhavratt@gmail.com
संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990








लातूर वर्ष ३ रे अंक १५५ वा शनिवार दि.११ नोव्हेंबर २०२३ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


# राज्यातील १०२१ मंडळात दुष्काळ जाहीर होणार

मुंबई : राज्यातील ४० तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करण्यात आल्यानंतर इतर तालुक्यांचं काय असा सवाल उपस्थित केला जात होता. त्याच पार्श्वभूमीवर आता इतर तालुक्यामधील १०२१ महसुली मंडळामध्ये दुष्काळसदृश्य परिस्थिती घोषित करण्यात येईल. त्यानुसार सवलती देखील लागू करण्यात आल्यात. काही दिवसांपूर्वी ४० तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करण्यात आला होता. त्यानंतर विरोधकांनी टीकेची एकच झोड उठवली होती. पण आता इतर तालुक्यांतही सवलती लागू करण्यात येणार आहेत.

१०२१ महसुली मंडळामध्ये दुष्काळसदृश्य परिस्थिती घोषित करुन सवलती लागू करण्याचा शासन निर्णय महसूल आणि वन विभागाने जारी केला. या शासन निर्णयानुसार ज्या महसुली मंडळामध्ये जून ते सप्टेंबर २०२३ या कालावधीमध्ये पर्जन्याच्या ७५ टक्क्यांपेक्षा कमी पाऊस झाला, अशा तालुक्यांची परिस्थिती पाहून दुष्काळ जाहीर सवलती लागू करण्यास शासनाने मंजुरी दिली.



## काय असणार सवलती?

ज्या तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करण्यात येणार आहे, तिथे कोणत्या सवलती देण्यात येतील याविषयी देखील माहिती देण्यात आलीये. या तालुक्यामध्ये जमीन महसूलात सूट, सहकारी कर्जाचे पुनर्गठन, शेतीशी निगडीत कर्जाच्या वसूलीस स्थगिती, कृषी पंपाच्या चालू विजबिलात ३३.५ टक्के सूट, शालेय / महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या परिक्षा शुल्कात माफी, रोहयो अंतर्गत कामाच्या निकषात काही प्रमाणात शिथिलता, आवश्यक तेथे पिण्याचे पाणी पुरविण्यासाठी टँकर्सचा वापर, टंचाई जाहीर केलेल्या गावात शेतक-यांच्या शेतीच्या पंपाची वीज जोडणी खंडीत न करणे अशा या सवलती लागू होतील.

## ४० तालुक्यांत दुष्काळ जाहीर

काही तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करण्याचा निर्णय घेतला होता. दुष्काळ जाहीर करण्याबाबतचा शासन आदेश सरकारने जाहीर केला. एकूण ४० तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करण्यात आला. राज्यातील १५ जिल्ह्यातील २४ तालुक्यामध्ये गंभीर तर १६ तालुक्यांमध्ये मध्यम दुष्काळ जाहीर झाला. राज्यातील तालुक्यांमध्ये जून ते सप्टेंबर या कालावधीतील पर्जन्याची तूट, उपलब्ध असलेल्या भूजलाची कमतरता, दूरसंवेदन विषयक निकष, वनस्पती निर्देशांक, मृदू आर्द्रता, पेरणीखालील क्षेत्र व पीकांची स्थिती या सर्व घटकांचा एकत्रित विचार करून या घटकांनी प्रभावित झालेल्या तालुक्यामध्ये आपत्तीची शक्यता विचारात घेवून सरकारने दुष्काळ जाहीर केला. जालना, छत्रपती संभाजीनगर, पुणे, नाशिक, बीड, लातूर, धाराशिव आणि सोलापूर जिल्ह्यातील जवळपास सर्वच तालुक्यात दुष्काळ जाहीर करण्यात आला.

# भारत आणि अमेरिका यांच्यात सामरिक मुद्द्यांवर एकमत

नवी दिल्ली : संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी शुक्रवारी त्यांचे अमेरिकन समकक्ष लॉयड ऑस्टिन यांच्याशी अनेक मुद्द्यांवर चर्चा केली. ते म्हणाले की, चीनच्या आक्रमकतेला तोंड देण्यासाठी भारत आणि अमेरिका यांच्यात सामरिक मुद्द्यांवर एकमत होत आहे. टू प्लस टू डायलॉगच्या पाचव्या आवृत्तीदरम्यान भारताशी झालेल्या चर्चेनंतर ऑस्टिन म्हणाले की, भारताला लवकरात लवकर ड्रोन क्षमता मिळावी यासाठी सरकार या दिशेने सतत प्रयत्न करत आहे.भारत-अमेरिका यांच्यातील २ प्लस २ मंत्रीस्तरीय बैठक शुक्रवारी सुरू झाली. संरक्षण




मंत्री राजनाथ सिंह म्हणाले की, दोन्ही देशांमधील भागीदारी मुक्त आणि नियम-बद्ध इंडो-पॅसिफिक क्षेत्र सुनिश्चित करण्यासाठी महत्त्वपूर्ण आहे. भारताकडून राजनाथ यांच्याशिवाय परराष्ट्र मंत्री एस जयशंकर यांनी या चर्चेत भारतीय शिष्टमंडळाचे नेतृत्व केले. यामध्ये अमेरिकेच्या बाजूचे नेतृत्व अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री अँटनी ब्लिंकन आणि अमेरिकेचे संरक्षण मंत्री लॉयड ऑस्टिन यांनी केले.भारत आणि अमेरिका यांच्यातील संबंधांवर ऑस्टिन म्हणाले की, आमचे संबंध केवळ चीनच्या पीपल्स रिपब्लिकशी संबंधित नाहीत. दोन्ही देशांमधील संबंध अनेक गोष्टींवर आधारित आहे. हे नाते सामायिक मूल्ये आणि लोकशाहीवर आधारित आहे. आम्ही समुद्राखालील आणि अंतराळ तंत्रज्ञानाच्या जगातही सहकार्य करत आहोत.

# केजरीवालांविरोधात घातपाताचा कट रचला जातोय

नवी दिल्ली : दिल्ली सरकारने आणलेल्या अबकारी धोरण घोटाळा आणि कथित मद्य घोटाळा झाल्याच्या आरोपावरुन सध्या दिल्लीच्या आप सरकारमधील मंत्री आणि नेते मंडळी केंद्रीय तपास यंत्रणांच्या टार्गेटवर आहेत.त्यातच ईडीने काही दिवसांपूर्वी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनाही चौकशीसाठी बोलावलं होतं. त्यानंतर त्यांच्या अटकेची चर्चा सुरु झाली. यापार्श्वभूमीवर आपचे खासदार संजय सिंह यांनी एक खळबळजनक दावा केला आहे.मद्य घोटाळाप्रकरणी खासदार संजय सिंह यांना ४ ऑक्टोबर रोजी ईडीने अटक केली होती. त्यानंतर त्यांची रवानगी सध्या न्यायालयीन कोठडीत करण्यात आली आहे. त्यांना आज दिल्लीच्या राऊज अव्हेन्यू कोर्टात




आणण्यात आलं. यावेळी सुनावणीसाठी नेताना बाजूला उभ्या असलेल्या माध्यमांच्या प्रतिनिधींशी त्यांनी संवाद साधण्याचा प्रयत्न केला. यावेळी त्यांनी केंद्र सरकारवर गंभीर आरोप केले. तसेच अरविंद केजरीवाल यांना अडकवण्याचा डाव आखला जात आहे. त्यामुळे त्यांना केवळ अटकच होणार नाही तर त्यांच्याविरोधात घातपात करण्याचा मोठा डाव आखला जात आहे, असा खळबळजनक आरोपच त्यांनी केला.

# मनोज जरांगे पाटील यांची छत्रपती संभाजीनगर येथे जाऊन माजी मंत्री आ. अमित देशमुख यांनी घेतली भेट

लातूर प्रतिनिधी : मराठा समाजाला आरक्षण मिळावे म्हणून सातत्याने लढा देत असलेले श्री मनोज जरांगे पाटील यांची आज छत्रपती संभाजीनगर येथील गॅलेक्सी हॉस्पिटलमध्ये जाऊन राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी शुक्रवार दि. १० नोव्हेंबर रोजी भेट घेतली. यावेळी त्यांनी आवश्यकतेनुसार नियमित औषधोपचार घ्यावेत, आराम करावा, काळजी घ्यावी असे सांगून त्यांची प्रकृती लवकरात लवकर ठणठणीत बरी व्हावी अशा शुभेच्छा या प्रसंगी दिल्या.यावेळी बोलतांना श्री मनोज जरांगे पाटील यांच्या लढ्याला आपला पाठिंबा असल्याचे नमूद करून राज्य आणि केंद्र शासनाने आता



वेळ न घालवता लवकरात लवकर मराठा समाजाला टिकणारे आरक्षण द्यावे अशी आपली भूमिका असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. महाराष्ट्र राज्यातील सामाजिक सलोखा कायम राखणे अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे, सामाजिक तेढ निर्माण होणारी वक्तव्य कोणत्याही नेत्यांनी करू नयेत यासाठी सर्वच राजकीय पक्षांनी पुढाकार घेणे आवश्यक असल्याचेही यावेळी पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तर देताना सांगितले.याप्रसंगी छत्रपती संभाजीनगर जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष, तथा जिल्हा कॉंग्रेसचे सरचिटणीस किरण पाटील डोणगावकर, जिल्हा बँकेचे संचालक जगन्नाथ काळे, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेचे कॉंग्रेस पक्षाचे माजी गटनेते भाऊसाहेब जगताप, छत्रपती संभाजीनगर कॉंग्रेस पक्षाचे शहराध्यक्ष शेख युसुफ यांचेसह सहकारी उपस्थित होते.

# राष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीपूर्वी तैवानमध्ये चिनी हेरांची चर्चा

तैपे : तैवानमध्ये राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुकीपूर्वी कथित चिनी हेरांची जोरदार चर्चा सुरु आहे. तैवान आणि चीन १९४९ पासून एकमेकांची हेरगिरी करत आहेत. गेल्या १० महिन्यांत चीनची हेरगिरी लक्षणीयरीत्या वाढल्याचा तैवानचा आरोप आहे. अलीकडेच हवाई दलाचे माजी कर्नल लिऊ शेंग शू यांना चीनसाठी हेरगिरी केल्याप्रकरणी २० वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा सुनावण्यात आली होती. या वर्षाच्या सुरुवातीपासून तैवानमध्ये किमान १६ जणांवर चीनसाठी हेरगिरी केल्याचा आरोप आहे. तज्ज्ञांचे म्हणणे आहे की, चिनी हेर केवळ गुप्तचर माहिती गोळा करत नाहीत तर ते जनमत चीनच्या बाजूने फिरवण्याचे कामही करत आहेत.त्याच वेळी, २०१३ ते २०१९ दरम्यान, तैवानमध्ये हेरगिरीची ४४ प्रकरणे नोंदवली गेली आहेत. या घटना अशा वेळी घडत आहेत जेंव्हा चीन लष्करी आणि राजकीय दबावाने तैवानवर आपला सार्वभौमत्वाचा दावा वाढवत आहे. हेरगिरी व्यतिरिक्त तैवान सरकारने निवडणुकीत चीनवर सायबर हल्ले केल्याचा आरोपही केला आहे. तैवानच्या नॅशनल सिक्युरिटी ब्युरोचे महासंचालक त्साई मिंग येन यांनी माध्यमांना सांगितले की, चीनने एकही गोळीबार न करता तैवानविरुद्ध दीर्घकाळ युद्ध केले आहे. मिंग येन यांना विश्वास आहे की, जानेवारी २०२४ मध्ये होणार्या अध्यक्षीय निवडणुकीपूर्वी अशा हेरगिरी आणि सायबर हल्ले वाढतील.जुलैमध्ये एका व्यक्तीवर चीनसाठी हेरगिरीचा आरोप करण्यात आला होता. लष्करी तळांजवळील दुकानांच्या मदतीने त्या व्यक्तीने सैनिकांशी मैत्री केली आणि त्यांच्याकडून गुप्तचर माहिती मिळवली, असा आरोप आहे. याशिवाय तैवानच्या व्यावसायिकांची चौकशी केल्यानंतर हेरगिरीची अनेक नवीन प्रकरणे समोर आली आहेत. या प्रदेशात दशके घालवलेले एक निवृत्त अमेरिकन कर्नल म्हणतात की, तैवान हे चिनी हेरांसाठी सोपे लक्ष्य आहे.

# दुसऱ्या तिमाहीत एलआयसीच्या नफ्यात ५० टक्क्यांनी घट

नवी दिल्ली : चालू आर्थिक वर्षाच्या दुसऱ्या तिमाहीत सार्वजनिक क्षेत्रातील विमा कंपनी एलआयसीच्या नफ्यात ५० टक्क्यांनी घट झाली आहे. कंपनीने शुक्रवारी एक निवेदन जारी केले की, ३० सप्टेंबर रोजी संपलेल्या दुसऱ्या तिमाहीत निव्वळ नफा ७,९२५ कोटी रुपये होता. गेल्या आर्थिक वर्षाच्या दुसऱ्या तिमाहीत कंपनीचा निव्वळ नफा १५,९५२ कोटी रुपये होता. या कालावधीत निव्वळ प्रीमियम उत्पन्न देखील मागील वर्षीच्या १.३२ लाख कोटी रुपयांच्या तुलनेत १.०७ लाख कोटी रुपये राहिले.

तथापि, दुसऱ्या तिमाहीत पहिल्या वर्षाचा प्रीमियम ९,९८८ कोटी रुपये होता, जो मागील वर्षी ९,१२५ कोटी रुपये होता. तसेच एलआयसीचे उत्पन्न गेल्या वर्षीच्या दुसऱ्या तिमाहीत २.२२ लाख कोटी रुपये होते, जे या वर्षी २ लाख १ हजार ५८७ कोटी रुपयांवर आले आहे. गेल्या सहा महिन्यांत एलआयसीने १७,४६९ कोटी रुपयांचा आतापर्यंतचा सर्वाधिक नफा कमावला आहे, जो




गेल्या वर्षीच्या पहिल्या सहामाहीत झालेल्या १६,६३५ कोटी रुपयांच्या नफ्यापेक्षा किंचित जास्त आहे.


दैनिक महावृत्त पहा ऑनलाईन कोठेही mhavratt.com या वेबसाईटवर पाहता येणार

## संपादकीय....

### ‘ट्रिपल इंजिन सरकार’ २४ डिसेंबरला काय करणार?

शिंदे सरकारने मनोज जरांगे यांना २ जानेवारी २०२४ ची मुदत दिली होती. पण ती २४ डिसेंबरवर आणून जरांगे पाटलांनी एक प्रकारे सरकारवर बंदूकच रोखली आहे. महाराष्ट्राच्या एकूण लोकसंख्येमध्ये मराठ्यांचे प्रमाण एक तृतीयांश आहे. पंजाबमध्ये जाट, गुजरातचे पटेल किंवा आंध्रचे रेड्डी असतात तसेच महाराष्ट्रामधले मराठे हे शेतकरी आहेत. ‘एक व्यक्ती, एक मत’ या तत्त्वामुळे भारताला स्वातंत्र्य मिळाल्यापासून राजकीय सत्ता शेतकरी समुदायांच्याच हातात एकवटली आहे. या समाजाची लोकसंख्या जास्त असल्यामुळे या समाजातील जमीनदार मंडळीना राजकीय सत्ता ताब्यात ठेवणे शक्य झाले आहे. पंजाबमधील जाट कुटुंबांनी शिक्षणाकडे आवश्यक ते लक्ष दिले. यामुळे ते प्रशासनातील उच्च पदांवर आणि पंजाबमध्ये सशस्त्र दलांमध्ये सहज प्रवेश करू शकले. गुजरातमधल्या पटेल आणि आंध्रमधल्या रेड्डींबाबतही असेच झाले. तो शिकण्याचा उत्साह महाराष्ट्रात मात्र दिसला नाही. मानवी विकासाचा हा पैलू इथल्या ब्राह्मणांनी आत्मसात केला. त्यामुळे प्रशासनात आणि सशस्त्र दलात वरिष्ठ स्तरावर त्यांची उपस्थिती जाणवण्यासारखी आहे. शेतीमध्ये काम मिळत नाही असे ग्रामीण महाराष्ट्रातील तरुण लष्करात गेले. शेतात काम करण्यासाठी मजुरांची गरज गेल्या काही वर्षांत झपाट्याने कमी झाली आहे. त्याचबरोबर आकांक्षाही वाढल्या आहेत. दूरचित्रवाणीने खेड्यापाड्यात प्रवेश केला आहे आणि दूरचित्रवाणीमुळे जवळच्या शहरांमध्ये काय चालले आहे हे याची माहिती मिळते. त्यांच्या गरजांनी नवीन क्षितिजांना स्पर्श केला आहे.केवळ महाराष्ट्रातच नव्हे, तर देशभरातील ग्रामीण तरुणांसमोर बेरोजगारी ही सर्वात मोठी समस्या आहे. सरकारी नोकऱ्यांमध्ये आर–क्षणाची मागणी आणि उच्च शिक्षणाच्या संस्थांमध्ये प्रवेश ही विकासाच्या या टप्प्याला स्वाभाविकपणे जोडणारी आहे. आपल्या राज्यघटनेत अनुसूचित जाती आणि जमातींसाठी सरकारी नोकऱ्यांमध्ये आरक्षण दिलेले आहे. समाजातील ‘वर्ण’ व्यवस्थेतील जुने अन्याय दूर करण्यासाठी ते होते.

माजी पंतप्रधान व्ही. पी. सिंग यांनी आणलेल्या मंडल आयोगाने अनुसूचित जाती आणि जमातींव्यतिरिक्त इतर मागासवर्गीयांना आरक्षण दिले. त्यात अनुसूचित जातींना साडेबारा टक्के आरक्षण दिले गेले होते आणि अनुसूचित जमातींना साडेसात टक्के, त्यामुळे २० टक्के सरकारी नोकऱ्या या दोन समूहांकडे गेल्या. मंडल आयोगाच्या शिफारशींनी अनुसूचित जातींना त्यांच्या संख्येशी संबंधित आणखी टक्केवारी दिली. त्यामुळे त्यांची टक्केवारी २० पेक्षा जास्त झाली. यासंदर्भात शैक्षणिकदृष्ट्या प्रगत जातींनी घेतलेल्या आक्षेपांवर सर्वोच्च न्यायालयाने निकाल दिला. त्यातून राखीव जागांसाठी ५० टक्के एवढी कमाल मर्यादा निश्चित केली आणि उर्वरित जागा गुणवत्तेवर स्पर्धा करणाऱ्यांसाठी सोडल्या गेल्या. या ५० टक्के मर्यादेला महाराष्ट्रातील मराठा आणि गुजरातमधील पटेल यांसारख्या राजकीयदृष्ट्या सामर्थ्यशाली समुदायांनी केलेल्या मागण्यांमधून सतत आव्ह–ान दिले जात आहे. त्यामुळे निर्णयकर्त्यांपुढे काय करायचे हा प्रश्न आहे. महाराष्ट्रातील धनगर आणि राजस्थानमधील गुज्जर यांसारख्या संख्यात्मकदृष्ट्या नगण्य गटांनीही अशाच मागण्या केल्या आहेत.लोकसभेची निवडणूक जेमतेम सहा महिन्यांवर आली आहे. त्या पार्श्वभूमीवर मराठ्यांच्या मागणीला सामोरे जाणे राज्य तसेच केंद्रातील सरकारला अवघड जाण्याची शक्यता आहे. निवडणूक प्रक्रियेत महाराष्ट्रातील मराठा समाज संख्यात्मकदृष्ट्या महत्त्वाचा आहे. त्यांचे आंदोलन थोपवणे सोपे नाही. मनोज जरंगे पाटील या फारशा माहीत नसलेल्या कार्यकर्त्याने मराठ्यांना उच्च शैक्षणिक संस्थांमध्ये आणि सरकारी नोकऱ्यांमध्ये आरक्षण मिळण्यासाठी आमरण उपोषण केले. त्यांच्या मागण्या मान्य करण्यासाठी त्यांनी सरकारला मुदतद–खील दिली होती. दोन निवृत्त न्यायाधीशांनी उपोषणाच्या ठिकाणी त्यांची भेट घेतली आणि सरकारला या अवघड परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी वेळ देण्याचे पटवून दिले. त्यानंतर २ जानेवारी २०२४ पर्यंत मराठा आरक्षणाबाबत निर्णय घेतला जाईल, असे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जाहीर केले. त्यावर जरंगे पाटील यांनी २४ डिसेंबर २०२३ ही तारीख दिली आहे. एका अर्थाने त्यांनी सरकारच्या डोक्यावर बंदूक रोखली आहे. पण अडचण अशी आहे की हे सरकार हे ट्रिपल इंजिनचे सरकार आहे. ५० टक्क्यांची मर्यादा न ओलांडण्याचा सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय या मागणीसाठी अडचणीचा ठरू शकतो.महाराष्ट्र सरकार आपली अडचण दूर करण्यासाठी आणखी एका मार्गाचा म्हणजे इतर मागासवर्गीयांमध्ये मराठ्यांचा समावेश करण्याच्या शक्यतेचा अभ्यास करत आहे. जरांगेनी दिलेली मुदत संपेपर्यंत पुन्हा आंदोलनाला सुरुवात होईल. त्याआधी सरकारला मराठ्यांचे कुणबी या पारंपरिकदृष्ट्या तुलनेत खालच्या वर्गात समायोजन करण्याचे मार्ग शोधावे लागतील. या वर्गामध्ये अल्पभूधारक आणि भूमिहीन मजुरांचा समावेश आहे. सामान्यतः हे कुणबीदेखील मराठे या वर्गातच मोडतात. भाषावर प्रांतरचनेनंतर मराठवाड्यातील निजामाच्या राजवटीतील पाच मराठी भाषिक जिल्हे महाराष्ट्रात समाविष्ट झाले. तेथे म्हणजे निजामाच्या राजवटीतील अधिकृत नोंदींमध्ये मराठे हा उल्लेखच नाही. तिथे सरसकट सर्वांची कुणबी अशी नोंद आहे. गोव्यातही मी मराठा हा शब्द ऐकला नव्हता. तिथेही कुणबी हाच शब्द सगळ्यांना माहीत होता.आजही महाराष्ट्रातील अनेकांना मराठा आणि कुणबी यामधील फरक नेमकेपणाने सांगता येत नाही. मराठा समजाला आपले वर्गीकरण क्षत्रिय म्हणजेच लढवय्ये म्हणून केले जावे, असे वाटते. या वर्गाचे सामाजिक स्थान तुल–नेने वरचे आहे. आजचे सामाजिक आणि आर्थिक वास्तव, शेतीपुढील समस्या, बेरोजगारी यामुळे काही मराठ्यांना कुणबी म्हणजेच मागासवर्गात स्थान मिळावे असे वाटते, जेणेकरून त्यांनाही आरक्षण मिळेल. क्षत्रिय असल्याची प्रौढी मिळविण्यापेक्षा अर्थार्जन महत्त्वाचे ठरत आहे.महाराष्ट्रातील ट्रिपल इंजिन सरकारने मराठवाड्यातील मराठ्यांचे कुणबी म्हणून वर्गीकरण सुरू केले आहे. निजामाच्या राजवटीत हे सहज शक्य होते, कारण त्या काळात सर्व मराठ्यांचा उल्लेख कुणबी म्हणूनच केला जात असे. असे वर्गीकरण पश्चिम महाराष्ट्रात स्वीकारले जाईल की नाही, हा मोठाच प्रश्न आहे. स्वत:ला कुणबी म्हणवणे हे हिंदू धर्मातील सामाजिक स्तरांत एक पायरी खाली उतरल्यासारखे वाटून अनेकांचा अभिमान दुखावला जाऊ शकतो. लोकसभा निवडणुका तोंडावर आल्या असतानाच मराठा आरक्षणाची मागणी जोर धरू लागली आहे.

# ‘सारथी’कडून मिळते संघ लोकसेवा आयोग परीक्षेचे मोफत प्रशिक्षण

राज्यातील मराठा, कुणबी, मराठा–कुणबी आणि कुणबी–मराठा समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक विकासासाठी २०१८ मध्ये छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्थेची (सारथी) स्थापना करण्यात आली. ’शाहू विचारांना देऊया गती, साधूया सर्वांगीण प्रगती’ हे ब्रीद घेवून काम करणाऱ्या ‘सारथी’ संस्थेमार्फत विविध कल्याणकारी उपक्रम व योजना राबविण्याचे काम ‘सारथी’ संस्थेमार्फत केले जात असून या योजनांच्या माहितीवर आधारित क्रमशः लेखमाला...‘सारथी’मार्फत राबविण्यात येणाऱ्या ‘संघ लोकसेवा आयोग परीक्षा मोफत प्रशिक्षण’ योजनेची माहिती आजच्या लेखात आपण घेणार आहोत. मराठा, कुणबी, मराठा–कुणबी आणि कुणबी–मराठा समाजातील उमेदवारांना केंद्रीय नागरी सेवेतील प्रशासकीय पदावर काम करण्याची संधी मिळावी, यासाठी ‘सारथी’संस्थेमार्फत संघ लोकसेवा आयोग अर्थात ‘युपीएससी’मार्फत घेण्यात येणाऱ्या नागरी सेवा परीक्षेचे निशुल्क प्रशिक्षण देण्यात येते. हे प्रशिक्षण देण्यासाठी ‘सारथी’ने पुणे येथील तीन प्रशिक्षण संस्था आणि दिल्ली येथील दोन संस्थांची निवड केली आहे. दरवर्षी युपीएससी नागरी सेवा स्पर्धा परीक्षा प्रशिक्षणासाठी चाळणी परीक्षा आणि कागदपत्रे पडताळणीद्वारे एकूण ५०० उमेदवारांची निवड करण्यात येते. या उमेदवारांना पूर्व परीक्षा, मुख्य परीक्षा आणि मुलाखत या तीन टप्प्यासाठी प्रशिक्षणाचे देण्यात येते. निवड झालेल्या उमेदवारांना ‘सारथी’ने निवडलेल्या पाचपैकी कोणत्याही एका संस्थेत प्रवेश घेण्याचा पर्याय उपलब्ध असतो.प्रशिक्षणार्थींना ‘सारथी’मार्फत असे मिळते सहाय्यउमेदवारांना निशुल्क प्रशिक्षणासोबत दिल्ली येथे प्रशिक्षण घेणाऱ्या उमेदवारांना तेथील वास्तव्यासाठी दरमहा १३ हजार रुपये आणि पुणे येथे प्रशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना तेथील वास्तव्यासाठी ९ हजार रुपये दरमहा दिले जातात. तसेच या उमेदवारांचा प्रशिक्षण संस्थेतील प्रवेश निश्चित झाल्यानंतर पुस्तके, स्टेशनरी आदी बाबींसाठी एकत्रित १८ हजार रुपये रक्कम आकस्मिक खर्च म्हणून दिली जाते. पूर्वपरीक्षा उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना मुख्य परीक्षेच्या तयारीसाठी एकरकमी ५० हजार रुपये आर्थिक सहाय्य दिले जाते. तसेच मुख्य परीक्षा उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना

“शाहू - विचारांना देवूया गती साधुया सर्वांगीण प्रगती”

मुलाखतीच्या तयारीसाठी एकरकमी २५ हजार रुपये अर्थसाहाय्य मंजूर करण्यात येते.

योजनेचा लाभ घेण्यासाठी या आहेत प्रमुख अटी उमेदवार हा महाराष्ट्रातील मराठा, कुणबी, कुणबी–मराठा, मराठा–कुणबी या प्रवर्गातील २१ ते ३२ वर्षे वयोगटातील असावा. याबाबत सक्षम प्राधिकारी यांनी निर्गमित केलेला जा–तीचा दाखला किंवा शाळा सोडल्याचा दाखला त्याच्याकडे असणे आवश्यक आहे. कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न ८ लाखापेक्षा अधिक नसावे. उमेदवाराच्या नावाचे तहसीलदार अथवा सक्षम प्राधिकारी यांनी निर्गमित केलेले शैक्षणिक वर्षाच्या लगतपूर्वीच्या वित्तीय वर्षीचे उत्पन्न प्रमाणपत्र व नॉन–क्रिमीलेअर प्रमाणपत्र किंवा ईडब्लूएस प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. अर्ज भरण्याच्या दिवशी उमेदवाराकडे कोणत्याही शाखेची पदवी असावी. उमेदवाराने इतर कोणत्याही शासकीय, निमशासकीय, खाजगी संस्थाकडून या प्रशिक्षणाचा लाभ घेतलेला नसावा.अशी आहे उमेदवारांची निवड पक्रिया

‘सारथी’च्या र्हीींिं://ीरींहळ–ारहरीरीहींरर्सीं.ळप/ या संकेतस्थळावर आणि वृत्तपत्रात जाहिरात प्रसिद्ध करून उमेदवारांकडून ऑनलाईन अर्ज मागविले जातात. अर्जदाराची निवड ‘सारथी’मार्फत आयोजित ‘सीईटी’मध्ये प्राप्त गुणांद्वारे केली जाते. या गुणांकानुसार गुणवत्ता यादी ‘सारथी’च्या संकेतस्थळावर जाहीर करण्यात येते. त्यानंतर कागदपत्रे पडताळणीद्वारे पात्र विद्यार्थ्यांची प्रवेश प्रकिया पूर्ण केली जाते. ‘सारथी’च्या प्रशिक्षणातून घडले १२ आयएएस, १८ आयपीएस...‘सारथी’मार्फत संघ लोकसेवा आयोगाच्या नागरी सेवा परीक्षेचे प्रशिक्षण घेवून २०२० ते २०२२ या गत तीन वर्षात १२ उमेदवार भारतीय प्रशासकीय सेवा (आयएएस) आणि १८ उमेदवार भारतीय पोलीस सेवेमध्ये (आयपीएस) दाखल झाले आहेत. तसेच ८ जणांची भारतीय राजस्व (आयआरएस) सेवेत, एका उमेदवाराची भारतीय वन सेवेत (आयएफएस) तर १२ जणांची इतर केंद्रीय सेवांमध्ये निवड झाली आहे.

सन २०२३–२४ मधील प्रशिक्षणासाठी ३१ डिसेंबर २०२३ पर्यंत करता येईल अर्ज सन २०२३–२४ मध्ये ‘सारथी’च्या संघ लोकसेवा आयोग परीक्षा मोफत प्रशिक्षण योजनेचा लाभ घेण्यासाठी उमेदवारांकडून ऑनलाईन अर्ज मागविण्यात आले आहेत. र्हीींिं://ीरींहळ–ारहरीरीहींरर्सीं.ळप/ या संकेतस्थळावर ३१ डिसेंबर २०२३ पर्यंत अर्ज सादर करता येणार आहेत. या संकेतस्थळावर योजनेच्या अटी, शर्ती आणि पात्रता निकषांची सविस्तर माहिती देण्यात आली आहे.

-------------

तानाजी घोलप, माहिती अधिकारी,
जिल्हा माहिती कार्यालय, लातूर

# संस्कृती वर वरचढ विकृती

भारत देश हा विविधतेने नटलेला देश आहे. विविधतेमध्ये एकता हेच भारताचे सर्वात मोठे व प्रभावी वैशिष्ट्य आहे. खाण पाण रहानी मानापासुन तर सन उत्सव संस्कृती प्रत्येक ठिकाणी विविधता आढळून येते. प्रत्येक समुदाय आपल्याला संस्कृती चे जतन करून आपापले सन उत्सव मोठ्या आनंदाने साजरे करत असतो. कोणत्याही समुहाचे सन उत्सव असले तरीही सामाजिक वातावरणात आपुलकी, जिव्हाळा व आनंदाचे वातावरण असते. जसे इद असेल तर महिना भर मुस्लीम समाज आपल्या घरातील शिरखुर्मा आपल्या देशाबांधवाना मोठ्या आनंदाने आपुलकी ने देऊळ बंधुभाव जपत असतात. दिवाळी असेल तर हिंदु समुदाय महिनाभर चांगल्या फराळाची चव आपल्या देश बांधाना देत असतात. सन उत्सव साजरा करताना मनात चुकीचे विचार, दुसऱ्या बद्दल दुय्यम अथवा हिन भावना मनामध्ये येत नाही. मानसाला माणूस म्हणून बघितले जाते. व माणसाला आपुलकी ने आपल्या घरी केलेल्या मिठाईचा गोडवा आपुलकी ने दिला जातो. सन उत्सव च्या पद्धतीने साजरे होऊन समाजात शांतता, आनंद व एकोप्याची भावना असते तिच भावना जर वर्षभर प्रत्येकांच्या मनात असेल तर सामाजिक वातावरण दुषीत होणार नाही. कारण सामाजिक वातावरण दुषीत होण्याच्या घटना खुप वाढल्या आहेत. एकिकडे देशात अनेक सन उत्सवाच्या माध्यमातून संस्कृती जपुन लोकांवर सामाजिक संस्कार घालुन माणुसकी ची शिकवण दिली जाते. परंतु सामाजिक वातावरण दुषीत करणारी विकृती येते तरी कुठून? सामाजिक विकृती पसरवणारे लोक आहेत तरी कोण? सामाजिक वातावरण दुषीत करून त्याचा फायदा नेमका कोणाला आहे आणि सर्वसामान्य लोकांचे सामाजिक वातावरण दुषित होऊन जी सामाजिक तेढ निर्माण होते त्यामध्ये काय नुकसान आहे. हे जोपर्यंत आपल्याला समजणार नाही तोपर्यंत आपण वर्षे भर कितीही सन उत्सव साजरे केले आणि सन उत्सव साजरे करताना मनात कोणतेही विचार नसतानाही आपण समाजातील वास्तविक परिस्थिती डोळेझाक करू शकत नाही. कारण एकीकडे संस्कृती चे काटेकोर पणे जतन करणारे लोक असताना विकृती डोके वर काढत आहे. फक्त डोकेच वर काढत नाहीत तर या विकृती ने अनेकांचे सामाजिक व वैयक्तिक जिवन उद्धस्त केले हे विसरून चालणार नाही. सन उत्सवाच्या माध्यमातून एकतेचा संदेश देणारा भारत महान देश आहे, जेव्हा सर्वसामान्य लोक वैयक्तिक पातळीवर गावामध्ये जिवन जगतात तेव्हा कोणताही भेद न करता सर्व कामे एकदम व्यवस्थित होत असतात. एक काम दुसऱ्या कामावर अवलंबून असते आणि या कामाच्या साखळी मध्ये प्रत्येक जाती धर्माणे लोक जोडले गेलेले असतात. एवढे काही सुरळीत असताना मग अचानक एखाद्या ठिकाणी जातीय वाद होऊन जातीय दंगल होते, दुसरीकडे कुठेतरी धार्मिक वाद होऊन धार्मिक दंगल होते. आणि या दंगली मध्ये दोन्ही समुहाच्या तरुणांवर गुन्हे दाखल होतात. ज्या कारणासाठी दंगल झाली त्याबद्दल कोणालाच काही माहिती नसते परंतु एकदा तरुणांवर गुन्हे दाखल झाले की दोन्ही समुहाला कोर्ट कचरीच्या फेऱ्या माराव्या लागतात. मानसिक व आर्थिक पिळवणूक होते. आज पर्यंत आनंदाने, प्रेमाने आपुलकी व बंधुभावाने वागणारे लोक एकमेकांचे शत्रु झालेले असतात. हे शत्रुत्व एका पीढीतुन दुसऱ्या पिढीत जाते. दुसरी गोष्ट म्हणजे मानसिक व आर्थिक नुकसान होऊन गुन्हे दाखल झालेल्या तरुणांना शिक्षण नोकरी ला मुकावे लागते. म्हणजे आपण बंधुभाव व एकात्मतेने वागलो तर प्रेम, आपुलकी, कायम राहून मानसिक व आर्थिक हानी होत नाही. आणि एकतेने बंधूभावाने वागले पाहिजे हिच शिवकण संस्कृती आणि संस्काराच्या माध्यमातून मिळत असेल तर माणसाला माणसा पासून दुर नेण्याची व तरुणांचे आयुष्य उद्धस्त करण्याची विकृती समाजामध्ये का रुजत आहेत. धर्माची शिवकण व संस्कृती एवढी कमकुवत आहे की तीला कोणीही मोडून काढून त्याचा वापर करून घेईल? धर्म आणि संस्कार आपल्याला लहाधपणा पासुन बंधुभाव शिकवत असतील तर द्वेष भाव नेमका येतो कुठुन? धर्माच्या शिवणीपेक्षा, संस्कारापेक्षा स्वतः च्या फायद्यासाठी धर्माचा वापर करणारा लोकांनी ओळखु नये? काही मोजक्याच लोकांच्या सांगण्यावरुन धर्माची शिकवण व संस्कार पायदळी तुडवणे आपल्या नितीमत्तेमध्ये बसते? असे अनेक प्रश्न उपस्थित राहतात. व धर्म आणि जाती याच्या नावावर राजकारण करून सत्ता भोगणारे लोक समाजात तेढ व द्वेष निर्माण होईल असे वातावरण प्रत्यक्ष अप्रत्यक्ष निर्माण करतात. राजकारणात बापावर विश्वास ठेवू नये असे सांगितले जाते तरीही लोक राजकारणी नेत्यावर विश्वास ठेवतात याचे कारण राजकीय नेते ज्यांना सत्ता भोगुन सर्वसामान्य लोकांचे आजही शोषण करायचे आहे. ते लोक वेगवेगळ्या जाती धर्मातील लोक हाताशी घेऊन त्यांना जाती धर्माबद्दल एखादे वादग्रस्त विधान करायला लावतात. एकदा वादग्रस्त विधान झाले की महिना दोन महिने लोकांचे लक्ष मुख्य समस्येवर येत नाही. शिक्षण, रोजगार, नोकरी, आरोग्य सुविधा व महागाई विषय बाजूला जातात. आणि कोणत्या जातीचे वा धर्माचे बरोबर आहे यासाठी वैयक्तिक पातळीवर जाऊन टिकाटीप्पणी करणे, एकमेकांना दोष देणे, वेळप्रसंगी दंगल घडणे आणि दंगल घडली की सर्व सामान्य लोकांवर गुन्हे दाखल होतात. आणि ज्यांनी वादग्रस्त विधान केले ते राजकारणी, त्यांचे मुलं, त्यांचे जवळचे नातेवाईक यांच्या वर एकही गुन्हा दाखल होत नाही. गुन्हे दाखल कोणावर होतात तर भाऊच्या ऑफिस भोवताली दिवसभर फिरून भाऊंसाठी काय पण म्हणणाऱ्या तरुणांवर, गुन्हे दाखल होतात अभ्यास करून नोकरी साठी खटाटोप करणाऱ्या तरुणांवर जेव्हा भाऊंसाठी कायपण म्हणतो आणि भाऊसाठी, भाऊच्या बोलण्यामुळे स्वतः च्या अंगावर गुन्हे दाखल होतात तेव्हा मात्र भाऊंना जमानत घ्यायला, आधार द्यायला वेळ नसतो. हि वास्तविक परिस्थिती समजून घेणे आवश्यक आहे. एकिकडे जनता व दुसरी कडे घाण केलेले राजकारण हे दोन आज वेगवेगळे आहे. अर्थात राजकारण योग्य पद्धतीने व जनतेच्या व देशाच्या हितासाठी केले तर भारत जगातील स्वर्ग बनेल असे वक्तव्य मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायधिशांनी केले होते. परंतु राजकारण चुकिच्या लोकांच्या हाती गेल्याने आणि राजकारणात लोकांच्या समस्या चा विचार न करता जाती धर्मावर राजकारण केल्याने राजकारणाची नैतिक पातळी खालावली आहे. म्हणजे सर्वसामान्य मानसाचा धर्म व राजकीय नेत्यांचा धर्म एक होऊ शकत नाही. ही गोष्ट लक्षात घेणे आवश्यक आहे. लोकांचा धर्म असतो एकमेकांना साह्य करून, एकमेकांच्या अडी अडचणीमध्ये धावून जाने व मदत करणे. राजकीय नेत्यांचा धर्म असतो जनतेच्या हक्काचे खाने, मानसा माणसात वाद निर्माण करणे व लोकांच्या समस्या वाढवणे. सर्व सामान्य लोकांची संस्कृती व संस्कार वेगळे आहेत, राजकीय लोकांचे संस्कृती व संस्कार वेगळे आहेत. सर्व सामान्य जनतेने शिक्षण, रोजगार, आरोग्य सुविधा, महागाई हक्क अधिकार यावर बोलु नाही म्हणून लोकांमध्ये फुट पाडली जाते जाती धर्माच्या नावावर लढवले जाते. परंतु राजकीय सत्तेतुन स्वतः चे खरे भरण्यासाठी सर्वजन एकत्र येऊन जनतेची लुट करतात. भाऊ, नाना, दादा अण्णासाठी लोक रस्त्यावर येऊन प्रचार करतात, डोक्यावर घेतात, परंतु लोकांना जेव्हा भाऊ, दादा अण्णा यांची गरज असते तेव्हा ते मात्र रस्त्यावर कधीच दिसत नाहीत हि वास्तविक परिस्थिती लक्षात घेऊन जागृत होणे आवश्यक आहे. पुर्वी पासून चालत आलेली संस्कृती, संस्कार हे केवळ राजकारणी लोकांसाठी पायदळी तुडवणे योग्य नाही. आपण सध्य परिस्थिती जरी बघितली तरी लहानातील लहान विषय मोठ्यात मोठा करून त्यामध्ये जातीय तेढ निर्माण करून एका जातीचा शत्रु दुसरी जात दाखवली जात आहे. अर्थात ही सर्व मांडणी राजकीय क्षेत्रातुन केली जाते. आपण ज्या धर्मात राहतो, ज्या धर्माने आपल्या वर संस्कार घातले त्या धर्माची अशी शिवकण आहे का आपल्याच धर्मातील जात आपल्याच धर्मातील जातीची शत्रु आहे? राजकिय नेते धर्म व जातीचा वापर त्यांच्या फायद्यानुसार करून घेऊन सत्तेची पोळी भाजून जनतेला मात्र उपाशी ठेवत आहेत. हे विसरून चालणार नाही. नेत्यांचे मुलं विदेशात शिक्षणाला आहेत. येथे लोकांकडे फि भरायला पैसे नाहीत. नेत्यांची मुल शिक्षण घेतांना करोडोचे मालक आहेत, येथे मेहनत करून बँक बँलन्स नाही, नेत्यांचे घरे हजारो करोडो रुपयांचे आहेत येथे सर्वसामान्य लोकांच्या घराची विट बदलने होत नाही, बऱ्याच लोकांकडून घरावरचे पत्रे बदलने होत नाहीत. राजकीय नेत्यांच्या शेतात करोडो रुपयांचा माल होतो शेतकरी रात्रंदिवस घाम गाळतो वर्षाकाठी त्याला मजुरीही उरत नाही. जनतेला लुटणाऱ्या, जनतेच्या धार्मिक पणाचा फायदा घेऊन सर्वसामान्य लोकांचे भविष्य उध्वस्त करण्याबाबत बोलले तर साहेबांच्या विरोधात बोलु नका म्हणणारे हि सर्वसामान्यच असतात. परंतु साहेब जनतेचा पुर्ण निधि लाटतो, शिक्षण नोकरी दवाखान्याचे खाजगीकरण होते तरीही बोलत नाही, शेतकऱ्यांच्या मालाला भाव मिळत नाही तरीही तोंडुन शब्दही काढत नाहीत अशा या साहेबांच्या वागण्याला संस्कृती म्हणायचे का विकृती? देशात अनेक सन उत्सव असतात. प्रत्येक व्यक्तीला अस वाटतं आपण आनंदाने उत्सव साजरा करून परिवारासोबत दोन घास चांगले खावे. पण आर्थिक परिस्थिती नाही. हि बाब लक्षात घेऊन सरकारने गरीबीची थट्टा केली आणि आनंदाचा शिक्षा म्हणून राशन मधुन काही खाद्यपदार्थ देशातील करोडो परिवारांना दिला जातो. राजकीय नेत्यांनी एक दिवस तरी आनंदाचा शिधा घेऊन आपल्या कुटुबांसोबत सन उत्सव साजरा करून दाखवावा. आनंदाचा शिधा नावाखाली गरीबांची चेष्टा सुरू आहे. एकिकडे दादा भाऊच्या मतदार संघात मोठ्या प्रमाणात आनंदाचा शिधा वाटला जातो. दुसरीकडे दादाची भाऊची संपत्ती शेकडो करोडो रुपये होऊन बसली हे कस शक्य आहे? नेमकी कोणती कमाई असते ही? आणि यालाच संस्कार म्हणायचे का? हा मुळ प्रश्न मात्र अजूनही कायम राहतो. दिवाळी हा सन सर्वात मोठा व प्रतिष्ठेचा मानला जातो. हा सन साजरा करायला कितीही लोकांनी कर्ज काढून सनाची तयारी केली आहे. एकिकडे वेगवेगळ्या कंपनीने, बँकांचे कर्ज व दुसरी कडे सनासाठी पुन्हा कर्ज खरंच त्या कुटुंबाला खरात बनवलेल्या नैवद्यात मनापासून आनंद मिळेल का? कर्जाचा डोंगर डोक्यावर असताना शांत झोप तरी लागेल का? अशा अनेक समस्या समोर आहेत. म्हणून सर्वसामान्य लोकांनी जागृत होऊन राजकारणी लोकांकडून धर्म व संस्कृती शिकु नये. कारण तेथे धर्माच्या नावाखाली विकृती पसरवून जनतेला समस्या ग्रस्त केले जाते. उलट जनतेने एकत्र येऊन शिक्षण, रोजगार, आरोग्य सुविधा महागाई विषयी प्रश्न विचारावे, शेतमालाला भाव माघावा आणि आपल्या संस्कारानुसार एकता व बंधुतेने वागावे तरच आपण वर्षभर सन उत्सव साजरे करून जो संदेश देतो तो सार्थक होईल व प्रत्येक घरात वातावरण आनंदीत राहील.

-------------

विनोद पंजाबराव सदावर्ते
समाज एकता अभियान
रा. आरेगांव ता. मेहकर
मोबा: ९१३०९७९३००

# देशातील प्रदुषण अत्यंत धोकादायक स्थितीत सावधान!

आज प्रदुषणामुळे देशातील संपूर्ण शहरे जखडल्याचे दिसून येते. दिल्लीसह अनेक शहरांतील हवा प्रदुषीत होत आहे..देशातील राज्यांचा विचार केला तर त्रिपुरा, महाराष्ट्र, गुजरात, बिहार, पंजाब, हरियाणा, उत्तरप्रदेश, राजस्थान, मध्यप्रदेश याही राज्यांनी यावर्षी प्रदुषणाची संपूर्ण सीमा ओलांडल्या आहेत. यामुळे संपूर्ण भारतात प्रदुषणाचा धोका वाढला आहे.याचा विपरीत परिणाम मानव, पशुपक्षी यांच्यावर मोठ्या प्रमाणात होत आहे.हिवाळा येताच हवेतील गुणवत्ता बिघडू लागते व यामुळे एक्युआय प्रमाण वाढत जाते आणि ज्या-ज्या ठिकाणचे एक्युआयचे प्रमाण वाढले त्या-त्या शहरात प्रदुषण चिंताजनक स्थितीत आहे असे समजले जाते.दिनांक ३ नोव्हेंबर २०२३ ला प्रदुषणाचा तडाखा इतका तीव्र होता की शंभर मिटर अंतरावरूनही इंडिया गेट दिसणे दुरापास्त झाले होते.या दिवशी दिल्लीतील अनेक भागांमध्ये प्रदुषीत हवेच्या गुणवत्तेचा निर्देशांक ४६० ते ८६५ पर्यंत इतका भयावह स्थितीत पोहोचला होता.अशा परिस्थितीत डॉक्टरांनी नागरिकांना मास्क वापरण्याचा सल्ला दिला आहे.आज देशात प्रदुषणामुळे ऐवढी भयानक स्थिती निर्माण केली आहे की देशातील ४० टक्के लोकांवर प्रदुषणाचे संकट ओढावले आहे.यामुळे अनेकांना वेगवेगळ्या आजारांशी सामना करावा लागतो आहे. सध्या दिल्लीमध्ये प्रदुषीत हवेची गुणवत्ता ४२१ निर्देशांकापर्यंत पोहचली तर राजस्थान मधील भिवाडी येथील आकडा ४३३ वर पोहचला होता यावरून आपण समजू शकतो की प्रदुषण घातक स्थितीत पोहचत आहे.त्याचप्रमाणे दुषित हवेचा गर्भातील बाळावरही परिणाम होवू शकतो व वृद्ध आणि मुलांना सुध्दा प्रदुषणाचा परिणाम होत आहे.नागपूर शहरातील वाढते प्रदुषण पहाता फटाके फोडण्याची रात्री १० वाजेपर्यंत वेळ प्रशासनाने निश्चित केली आहे.मुंबई उच्च न्यायालय आणि महाराष्ट्र शासनाच्या आदेशानुसार हे पाऊल नागपूर महानगरपालिकेने उचलल्याचे समजते.यामुळे प्रदुषण नियंत्रित ठेवण्यास मोठी मदत होईल.सरकारने वायुप्रदूषण नियंत्रित आणण्यासाठी मुख्यत्वे करून सरकारी वाहनांवर करडी नजर ठेवुन दंडात्मक कारवाई करणे अत्यंत गरजेचे आहे.कारण महाराष्ट्रातच नाही तर संपूर्ण भारतात प्रदुषित धुळ ओकण्याचे काम सरकारी वाहनच जास्तीत जास्त करीत आहे.सरकारने लोकांना ग्यान सांगण्याच्या अगोदर सरकारने आपले घर म्हणजे सरकारी वाहनांवर नियंत्रित आणने अत्यंत आवश्यक आहे.मागील वर्षीपेक्षा यावर्षी प्रदुषणाचे प्रमाण जास्त राहण्याची शक्यता आहे. कारण यावर्षी कमी पाऊस पडल्याने ही समस्या उद्भवतांना दिसते.दिल्ली गॅस चेंबर बनण्याचे मुख्य कारण म्हणजे आजुबाजुच्या राज्यात पराली मोठ्या प्रमाणात जाळल्याने व दिल्लीत वाहनांची संख्या सर्वात जास्त असल्याने दिल्लीची स्थिती गॅस चेंबर सारखी झाली आहे.महाराष्ट्रासह देशात दिवाळीच्या दिवशी मोठ्या प्रमाणात फटाके फुटणार परंतु यामुळे डोळ्यांना दुखापत, त्वचा भाजणे, फुफ्फुसाच्या आजाराची शक्यता व फटाक्यांच्या आवाजामुळे आणि प्रदुषणामुळे सर्दी, खोकला, घसादुखीचा त्रास व कानांचा त्रास वाढु शकतो.त्यामुळे पालकांनी फटाके फोडतांना मुलांची व खासकरून चिमुकल्यांची विशेष काळजी घेतली पाहिजे.तसे पहाले तर प्रदुषणाच्या बाबतीत भारताची अत्यंत वाईट परिस्थिती आहे. कारण जगात प्रदुषणाच्या बाबतीत भारताचा आठवा क्रमांक लागतो. अत्यंत गंभीर बाब म्हणजे जगातील टॉप १०० सर्वाधिक प्रदूषित शहरांपैकी ६५ शहरे एकट्या भारतातील आहेत.यात मुख्यत्वे करून टॉप १० मधील भारतीय शहरांमध्ये बिहारमधील दरभंगा, आसोपूर, पाटणा,नवी दिल्ली, कोलकाता, मुंबई, हैद्राबाद, बंगळूरु, चेन्नई यांचा समावेश आहे ही अत्यंत गंभीर बाब आहे.स्वित्झर्लडची संस्था आयक्यू एअरने मंगळवार दिनांक १४ मार्च २०२३ वर्ल्ड एअर क्वॉलिटी रिपोर्ट(जागतिक वायू गुणवत्ता अहवाल) नावाचा आपला अहवाल प्रसिद्ध केला.या अहवालात हेही सांगितले आहे की १५० अब्ज डॉलरचे नुकसान वायू प्रदूषणामुळे भारताला झाल्याचा अंदाज या अहवालात व्यक्त करण्यात आला आहे.भारतातील वायू प्रदूषणाचा सर्वात मोठा घटक म्हणजे वाहतूक क्षेत्र असुन एकुण प्रदुषणात त्याचा वाटा २०-३५ टक्के आहे ही अत्यंत गंभीर व चिंताजनक बाब आहे.वाढते प्रदुषण लक्षात घेता देशातील जनतेला मी आग्रहाची विनंती करतो की फटाके कमीत कमी फोडण्याचा प्रयत्न करावा जेणेकरून आपण प्रदुषणावर नियंत्रण ठेवता येईल. कारण वाढते प्रदुषण दिवसेंदिवस मानसाच्या काळजात घर करीत आहे व याचा पुढे चालून भयावह परिणाम भोगावा लागू शकतो याला नाकारता येत नाही.त्यामुळे प्रदुषणापासुन सावध रहाण्यासाठी फटाके कमीत कमी फोडण्याचा प्रयत्न करावा व वाढते प्रदुषण रोखण्याच्या उद्देशाने प्रत्येकांनी आप आपल्या पध्दतीने कार्य करावे.

------------------------------

लेखक
रमेश कृष्णराव लांजेवार
(माजी विद्यापीठ प्रतिनिधी, नागपूर)
मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.

## इंडियन सोसायटी ऑफ पिडोडॉन्टीक्स ण्ड प्रिव्हेन्टीव डेन्टीस्ट्रीच्या राष्ट्रीय कार्यकारिणीवर विशेष सदस्यपदी डॉ. महेश दडपे यांची निवड



लातूर :- येथील एमआयडीएसआर दंत महाविद्यालयातील बाल दंत रोग विभागातील प्रा. डॉ. महेश दडपे यांची इंडियन सोसायटी ऑफ पिडोडॉन्टीक्सण्डप्रिव्हेन्टीव डेन्टीस्ट्री (खड्झझऊ) च्या राष्ट्रीय कार्यकारीणीवर विशेष सदस्य (एउ चशालशी) म्हणून नुकतीच निवड झाली आहे. अहमदाबाद, गुजरात येथे नुकत्याच पार पडलेल्या आयएसपीपीडी परिषदेत निकषानुसार डॉ. महेश दडपे यांची परिषदेच्या राष्ट्रीय कार्यकारीणीवर विशेष सदस्य म्हणून निवड करण्यात आली. या परिषदेचे अध्यक्ष डॉ. राधीका मुप्पा व जनरल सेक्रेटरी डॉ. निखिल श्रीवास्तव यांनी ही निवड जाहिर केली. सन २०२३-२४ अशा एक वर्षाच्या कालावधीसाठी ही निवड करण्यात आलेली आहे. बाल दंत आरोग्य विषयीचे धोरण निश्चित करणारी ही राष्ट्रीय सोसायटी असून ती देशाच्या आरोग्य मंत्रालयाशी संलग्नीत आहे. या निवडीबद्दल डॉ. महेश दडपे यांचे एमआयडीएसआर दंत महाविद्यालयाचे कार्यकारी संचालक डॉ. हनुमंत कराड, प्राचार्य डॉ. सुरेश कांगणे, उप प्राचार्य डॉ. यतीशकुमार जोशी यांच्यासह एमआयडीएसआर दंत महाविद्यालयातील डॉक्टर व विद्यार्थ्यांकडून अभिनंदन होत आहे.

## हिमाचलमध्ये २५०० कोटींचा क्रिप्टो घोटाळा; १८ आरोपींना अटक

शिमला : हिमाचलमध्ये २५०० कोटी रुपयांच्या क्रिप्टो करन्सी घोटाळ्यात ५ हजार सरकारी कर्मचाऱ्यांसह एक लाख लोकांची फसवणूक झाली आहे. आतापर्यंत ४ पोलिस कर्मचाऱ्यांसह १८ आरोपींना अटक करण्यात आली आहे. तसेच १२ कोटी रुपयांची मालमत्ताही जप्त करण्यात आली आहे. याप्रकरणी विशेष तपास पथक (एसआयटी) स्थापन करण्यात आले असून त्यांची चौकशी सुरू आहे. टेरर फंडिंगची शक्यता पाहता केंद्रीय यंत्रणांकडूनही मदत मागवण्यात आली आहे. तथापि, आता हिमाचलचे उपमुख्यमंत्री मुकेश अग्निहोत्री यांच्या म्हणण्यानुसार, या क्रिप्टो करन्सी घोटाळ्यातले ५०० कोटी रुपये वसूल होणार नाहीत.मिळालेल्या माहितीनुसार, क्रिप्टो करन्सी फसवणुकीचा मास्टरमाईंड सुभाष शर्मा २०० कोटी रुपये कमवून दुबईला पळून गेला होता. त्याला भारतात परत आणण्याचे प्रयत्न सुरू आहेत. ५००० सरकारी कर्मचाऱ्यांनीही क्रिप्टोमध्ये पैसे गुंतवले होते. काहींनी तर नोकरीही सोडली. फेअरलेनमधील जमिनीचा मोबदला मिळालेल्यांचे पैसेही या फसवणुकीत गुंतवले गेले. याप्रकरणी पोलिस लवकरच चालान जारी करणार आहेत. याप्रकरणी पोलिसांनी ८० मोबाईल जप्त केले आहेत.क्रिप्टो करन्सी घोटाळ्यात पोलिसांनी आतापर्यंत १८ आरोपींना अटक केली आहे. १२ कोटी रुपयांची मालमत्ताही जप्त करण्यात आली आहे. पैसे दुप्पट करण्याच्या लालसेपोटी एक लाख लोकांची फसवणूक झाली आहे. यामध्ये ५ हजार सरकारी कर्मचाऱ्यांचा समावेश आहे.

## एअर इंडियाला दर सहा दिवसांनी नवीन विमान मिळेल: सीईओ




सिंगापूर: एअर इंडियाचे मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) आणि व्यवस्थापकीय संचालक कॅम्पबेल विल्सन यांनी शुक्रवारी सांगितले की, कंपनीने ४७० विमानांची ऑर्डर दिली आहे आणि पुढील १८ महिन्यांसाठी एअर इंडियाला दर सहा दिवसांनी एक नवीन विमान मिळेल. ते म्हणाले की, आमच्याकडे नवीन विमाने आहेत, आम्ही अनेक नवीन क्रू आणि कर्मचारी भरती करत आहोत, प्रशिक्षण प्रणाली सुधारत आहोत आणि अजून बरेच काम करायचे आहे. आम्ही चांगली प्रगती करत आहोत, असे ते म्हणाले.विल्सन म्हणाले की, एअर इंडियाच्या बहुतांश ग्राहकांना विश्वासार्हता आणि वक्तशीरपणा हवा आहे. ग्राहकांच्या गरजा पूर्ण करण्याचे आव्हान आमच्यासमोर आहे. याशिवाय, आंतरराष्ट्रीय उड्डाणांवर नवीन विमाने तैनात केली जात आहेत आणि बहुतेक ग्राउंडेड विमाने सेवेत आणली गेली आहेत. ते म्हणाले की, टाटाच्या मालकीच्या एअर इंडियाने आठ टक्क्यांच्या संचयी वार्षिक विकास दराने वाढणाऱ्या भारतीय अर्थव्यवस्थेला सेवा देण्यासाठी ४७० विमानांची ऑर्डर दिली आहे आणि पुढील १८ महिन्यांत दर सहा दिवसांनी एक नवीन विमान घेण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. विल्सन यांनी इतर विमान कंपन्यांशी स्पर्धा करण्याचा आणि एअर इंडियासाठी वाहतूक वाढविण्याचा विश्वासही व्यक्त केला.

## मोबाईल हिसकावणाऱ्या जबरीचोरी मधील २ आरोपींना मुद्देमालासह अटक.
## १० मोबाईल व एक मोटरसायकलसह १,६०,००० /-रुपयांचा मुद्देमाल जप्त...
## स्थानिक गुन्हे शाखेची कामगिरी.

लातूर :- मोबाईल हिसकावणाऱ्या जबरीचोरी मधील २ आरोपींना मुद्देमालासह अटक. १० मोबाईल व एक मोटरसायकलसह १,६०,००० /-रुपयांचा मुद्देमाल जप्त...ढ११ऻऻ या बाबत थोडक्यात हकीकत अशी की, काही दिवसांपूर्वी अनोळखी आरोपींनी पोलीस ठाणे एमआयडीसी हद्दीत एकास अडवून जबरीने त्याच्याकडील मोबाईल हिसकावून घेऊन पळून जाण्याची घटना घडली होती. त्यावरून पोलीस ठाणे एमआयडीसी येथे ३९२, ३४ भादवि कलमाखाली गुन्हा दाखल करण्यात आला होता.

पोलीस अधीक्षक श्री. सोमय मुंडे यांनी सदर गुन्ह्यातील आरोपींना अटक करणे बाबत आदेशित करून सूचना केल्या होत्या. पोलीस अधीक्षक सोमय मुंडे,अपर पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांचे नेतृत्वात पोलीस पथक तयार करण्यात आले.



सदर पथकाने फिर्यादीकडे सखोल विचारपूस करून त्याने सांगितलेल्या वर्णनावरून पोलीस स्टेशनच्या अभिलेखा वरील व लातूर शहरालगत असलेल्या जिल्ह्यातील अनेक गुन्हेगारांची चाचपणी करण्यात येत होती. दरम्यान दिनांक ०८/११/२०२३ रोजी पोलीस पथकाला मिळालेल्या विश्वासनीय व गोपनीय माहितीचे विश्लेषण करून सदरची माहिती वरिष्ठांना कळवून आरोपी नामे.

सौदागर उर्फ सौद्या अशोक हजारे, वय २० वर्ष, राहणार राम कृष्ण नगर, लातूर,

रवी भुजंग कसबे,वय १९ वर्ष,राहणार लक्ष्मी कॉलनी, जुना औसा रोड, लातूर.

यांना लातूर शहरातील जुना औसा रोड परिसरात त्यांनी चोरलेले मोबाईल विकण्याचा प्रयत्न करीत असताना ताब्यात घेऊन विचारपूस केली असता त्यांनी लातूर शहरातील वेगवेगळ्या ठिकाणाहून दोघांनी मिळून मोटर सायकल वरून तसेच पायी जाणाऱ्या इसमाना अडवून त्यांच्याकडील मोबाईल जबरीने लुटले आहे, असे कबूल करून ताब्यातील चोरलेले एकूण १० मोबाईल, गुन्हे करताना वापरलेली एक मोटरसायकल असा एकूण १,६०,०००/- रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

सदरच्या आरोपी कडून जप्त केलेल्या मुद्देमालावरून पोलीस ठाणे एमआयडीसी येथे जबरी चोरी संदर्भात दाखल असलेला एक गुन्हा उघड झाला असून विविध ठाण्याचे अभिलेखा वरुन लातूर शहरातील विविध पोलीस स्टेशनला दाखल असलेले आणखीन गुन्हे उघड होण्याची शक्यता आहे.

गुन्ह्याचा पुढील तपास एमआयडीसी पोलीस ठाण्याचे पोलीस अधिकारी,अमलदार तपास करीत आहेत.

सदरची कामगिरी वरिष्ठांचे मार्गदर्शनात व स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांचे नेतृत्वात पोलीस अंमलदार माधव बिलापट्टे, नवनाथ हासबे, राजेश कंचे, मोहन सुरवसे, राजू मस्के, तुराब पठाण, जमीर शेख, यांनी केली आहे.

# एक भारतरत्न: मौलाना अबुल कलाम आझाद!

मौलाना अबुल कलाम आझाद यांना इंग्रजांनी अहमदनगर येथील तुरुंगात ठेवले होते. त्या वेळी त्यांनी हे उद्गार काढले, इंग्रजांना मी सत्ताधारी मानत नाही तर त्यांना मी विनंती का करू? आझाद यांच्या पत्नीचे निधन झाले होते. तेव्हा इंग्रजांनी त्यांना निरोप दिला की, पत्नीच्या दफनविधीसाठी आम्ही तुम्हाला सोडू; पण तुम्ही तसे विनंतीपत्र इंग्रज सरकारला द्या. त्यावेळी त्यांनी इंग्रजांना असे बाणेदार उत्तर दिले. मौलाना आझादांचा जन्मदिवस ११ नोव्हेंबर हा शिक्षण दिवस म्हणून साजरा करण्याचे केंद्र सरकारने नुकतेच जाहीर केले आहे, हे विशेष! अशा निर्भीड वाचस्पतीच्या जयंती निमित्त श्री कृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरूजींनी आपल्या शैलीत केलेले त्यांचे हे गुणगौरव!.. संपादक.

मौलाना आझाद यांचा जन्म ११ नोव्हेंबर १८८८ रोजी सौदी अरेबिया या देशातील पवित्र भूमी मक्का येथे झाला. त्यांचे वडील मौलाना खैरुद्दीन हे धर्मगुरू होते. ही भूमी त्यांना न मानवल्याने ते आपल्या कुटुंबासह भारतात आले आणि त्यांनी कोलकाता शहरात वास्तव्य केले. मौलाना आझाद यांच्या मातोश्री मक्का येथील धर्मगुरूंच्या कुटुंबातील होत्या. आई आणि वडील या दोघांकडील घराणे उच्चशिक्षित होते. मुलाचे पाय पाळण्यात दिसतात या न्यायाने ते लहानपणापासूनच अतिशय हुशार होते. ते इस्लाम धर्माचे आधुनिक विचारवंत होते. आई आणि वडिलांची घराणी कट्टरपंथी असली तरी आझाद कट्टरपंथी नव्हते. त्यांनी इस्लामचा पवित्र धर्मग्रंथ कुराणाचा अभ्यास करून त्यावर तर्जुमानुल कुरान हे पुस्तकही लिहिले आहे. त्यांना अरबी, फारशी, इंग्रजी व उर्दू या भाषा चांगल्या अवगत होत्या व ते चारही भाषांतून लिखाण करीत असत. ते एक उत्कृष्ट वक्तेदेखील होते. त्यांचे भाषण ऐकण्यासाठी हजारोंच्या संख्येने लोक उपस्थित राहत असत. ते हिंदू-मुस्लिम ऐक्याचे प्रतीक होते. अनेक हिंदू विचारवंत त्यांचे चाहते होते. ते भारताच्या स्वातंत्र्यसंग्रामातील एक निष्ठावान शिपाई होते. फारसा गाजावाजा न करता कार्य करीत राहणे हे त्यांचे वैशिष्ट्य होते.

मौलाना अबुल कलाम हे भारताचे एक प्रमुख राजकीय पुढारी होते. त्यांचे मूळ नाव मोहिउद्दीन अहमद असे असून अबुल कलाम म्हणजे वाचस्पती ही त्यांची पदवी होती. पुढे आझाद (स्वतंत्र) हे टोपणनावही ते लावू लागले. वडिलांबरोबर सन १८९० साली ते कलकत्याला आले. पारंपरिक मुसलमानी शिक्षण पद्धतीप्रमाणे त्यानी फार्सी, उर्दू व अरबी या भाषांचे प्रथम अध्ययन केले. नंतर त्यांनी तर्कशास्त्र, इस्लाम धर्म, तत्त्वज्ञान व गणित यांचा अभ्यास केला. पुढे सर सय्यद अहमदखान यांच्या लेखांचा परिणाम होऊन त्यांनी इंग्रजीचा अभ्यास स्वतंत्रपणे सुरू केला. इ.स.१९०८मध्ये ईजिप्त, अरबस्थान, तुर्कस्थान, फ्रान्स आदी देशांना त्यांनी भेटी दिल्या. तेथील क्रांतिकारकांच्या संपर्कामुळे त्यांची राजकीय मते बदलू लागली आणि कलकत्त्यास परत येताच हिंदी मुसलमानांनी स्वातंत्र्यसंग्रामात पुढाकार घ्यावा, असे मत त्यांनी प्रतिपादित केले. लोकजागृतीसाठी सन १९१२ साली कलकत्ता येथे त्यांनी अल्-हिलाल हे उर्दू साप्ताहिक सुरू केले. अनेक वृत्तपत्रांतून आझाद या टोपणनावाने ते लेखन करीत. अल्-हिलालमधील प्रखर राजकीय टीकेमुळे ब्रिटिश सरकारने त्यांच्याकडून दहा हजार रुपयांचा जामीन मागितला. आझादांनी तो दिला नाही, म्हणून ते वृत्तपत्र बंद पाडले. दोन वर्षांनी त्यांनी अल्-बलाघ हे दुसरे वृत्तपत्र काढले. त्यामुळे आझादांना अनेक प्रांतांत जाण्यास बंदी घालण्यात आली; पुढे त्यांना सांचीला स्थानबद्ध करण्यात आले. मुसलमानांत त्यांच्या अटकेमुळे नवे वारे संचारले. इ.स.१९२० साली त्यांची सुटका झाली.

भारताच्या स्वातंत्र्यसंग्रामात भाग घेतला नसता तर त्यांनी गुरू-शिष्य परंपरेत म्हणजेच पीर-मुरीदी परंपरेत खूप चांगले कार्य केले असते. त्यांच्या गळ्यात असणाऱ्या स्वरगंगेत लोक न्हाऊन निघत असत. परंतु संगीत क्षेत्रातही न रमता गांधीजी, पंडित जवाहरलाल नेहरू, डॉ.राजेंद्रप्रसाद, ॲनी बेझंट, लालबहादूर शास्त्री, वल्लभभाई पटेल यांच्यासमवेत भारतीय स्वातंत्र्यलढ्यात त्यांनी उडी घेतली. सुरुवातीला ते सर सय्यद यांच्या विचारांनी भारावलेले होते. परंतु सर सय्यद यांनी इंग्रजांशी मैत्री केल्यामुळे प्रखर राष्ट्रवादी असलेल्या मौलाना आझाद यांनी त्यांच्याशी नाते तोडले. भारत हा आपला देश आहे. त्यावर परकीयांचा ताबा ही दडपशाही आहे, अशी त्यांची भूमिका होती. भारतावर स्वकीयांचीच सत्ता हवी, असे त्यांचे मत होते. कष्ट आणि निष्ठा यावर त्यांची नितांत श्रद्धा होती. शेवटपर्यंत त्यांनी या विचारांवरच वाटचाल केली. इंग्रजांनी १८५७मध्ये संपूर्ण भारतावर ताबा मिळवला. त्याच लढाईत भाग घेणाऱ्या मुस्लिम घराण्यांमधील लोकांची इंग्रजांनी कत्तल केली व त्यांच्यावर अत्याचार केले. काही जणांना काळ्या पाण्याची शिक्षाही दिली तर अनेकांना दिल्लीच्या रस्त्यावर फाशी दिली. यात मुसलमानांची संख्या अधिक होती. कारण इंग्रजांची अशी भूमिका होती की, मुसलमान हे या देशाचे राजे होते. त्या वेळी भारतीय मुसलमानांच्या मनात मोठ्या प्रमाणावर नैराश्य पसरले. पूर्वी बाप वा राजा या भूमिकेत वावरणारे मुसलमान इंग्रजांनी सत्ता बळकावल्यामुळे दुखावले गेले होते. त्यानंतर पन्नास-साठ वर्षांपर्यंत कोणीही मुलसमान इंग्रजांसमोर येण्यास तयार नव्हते. सर सय्यद यांच्यासारखे बुद्धिवंत इंग्रजांशी हात मिळवून त्यांच्या बाजूने बोलत असत. अशा वेळी त्यांनी भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात एका निष्ठावान राष्ट्रवादी मुसलमानाची भूमिका बजावली. मौलाना आझाद देशाची अखंडता अबाधित राखण्यासाठी अहोरात्र झटत होते. गांधीजींशी चर्चा केल्यानंतर त्यांनी देशाचे विभाजन स्वीकारले, पण जे मुसलमान भारत सोडून पाकिस्तानला स्थलांतरित होत होते, त्यांना त्यांनी विरोध केला होता. ते हिंदू-मुस्लिम ऐक्याचे सच्चे प्रतीक होते.

सन १९४७मध्ये भारताला स्वातंत्र्य मिळाले. पं.जवाहरलाल नेहरूंनी मौलानांकडे शिक्षण मंत्रालयाचे काम सोपवले व ते स्वतंत्र भारताचे पहिले शिक्षणमंत्री झाले. त्यांनी त्या काळी अत्यंत बिकट परिस्थितीतही भारतात शिक्षणाचा प्रसार व प्रचार उत्तम प्रकारे राबवला. त्यांना युरोपच्या तत्कालीन समस्यांचे चांगले ज्ञान होते. जर्मन आणि इटलीच्या सत्ताधाऱ्यांची दडपशाही संपूर्ण जगासाठी मोठा धोका ठरणार आहे, असे ते सांगत. हिटलरच्या काळात अल्पसंख्याक व बुद्धिजीवींची सर्रास कत्तल होईल, हे मौलानांनी सांगितले होते आणि तसेच घडले. हे जगाने पाहिले व अनुभवलेही. हाऊस ऑफ लार्ड्सचे सदस्य लॉर्ड बटमली, ज्यांनी जवळपास ६० वर्षे इंग्लंड व भारताच्या राजकारणात भाग घेतला, ते मौलानांबद्दल म्हणतात, मौलाना आझाद विशाल मनाचे व्यक्ती होते. त्यांनी भारताच्या स्वातंत्र्य व अखंडतेसाठी कायम प्रयत्नांची पराकाष्ठा केली. स्वातंत्र्यलढ्यात त्यांची भूमिका खूप मोलाची ठरली. त्यांना युरोपियन साहित्याचेही चांगले ज्ञान होते. महाकवी बायरन आणि फ्रान्सच्या कादंबरीकारांची त्यांना चांगली माहिती होती. दि.२३ फेब्रुवारी १९५८ रोजी दिल्लीत मौलाना अबुल कलाम आझाद यांचे निधन झाले.

मौलाना आझाद प्रभावी वक्ते होते. त्यांचे इंग्रजी, उर्दू, अरबी व फार्सी भाषांवर चांगले प्रभुत्व होते; त्यांनी अनेक वृत्तपत्रांतून स्फुट लेखन केले आणि उर्दूत काही पुस्तके लिहिली आहेत. त्यांतील तजकेरा, गुब्बारे खातिर, कौले फैसल, दास्ताने करबला, तरजुमानुल कोरान ही पुस्तके प्रसिद्ध आहेत. तरजुमानुल कोरान म्हणजे कुराणचा सटीप उर्दू अनुवाद असून तो फार लोकप्रिय आहे. याशिवाय त्यांचे इंडिया विन्स फ्रीडम हे आत्मचरित्र त्यांच्या मृत्यूनंतर प्रसिद्ध झाले आहे. केंद्र सरकारने इ.स.१९९२मध्ये त्यांना मरणोत्तर भारतरत्न किताब प्रदान केले. !! राष्ट्रीय शिक्षण दिन व जयंती निमित्त त्यांना सप्ताहभर विनम्र अभिवादन !!

------------------------------

श्री कृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरुजी.
भारतीय सत्पुरूषांच्या चरित्र-इतिहासाचे गाढे अभ्यासक.
मु. रामनगर वॉर्ड क्र.२०, गडचिरोली.
पो. ता. जि. गडचिरोली.
भ्रमणध्वनी - ९४२३७१४८८३.

# दोघा अट्टल मोबाईल चोरांना पोलीसांनी केले गजाआड

लातूर : प्रतिनिधी लातूर शहरामध्ये नागरिकांना अडवून त्याच्याकडील मोबाईल जबरदस्तीने हिसकावून घेवून चो-या करणा-या सौदागर उर्फ सौद्या अशोक हजारे रा. रामकृष्णनगर लातूर, रवि भुजंग कसबे रा. लक्ष्मी कॉलनी जुना औसा रोड लातूर या दोघांना स्थानीक गुन्हे अन्वेषण विभागाच्या पथकाने हिसकावलेले १० मोबाईल व एक मोटारसायकल असे एकूण १ लाख ६० हजार रूपयांच्या मुद्देमालासह अटक केली आहे. पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांनी सदर गुन्ह्यातील आरोपींना अटक करणे बाबत आदेशित करून सुचना केल्या होत्या.पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, अपर पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरिक्षक संजीवन मिरकले यांचे नेतृत्वात पोलीस पथक तयार करण्यात आले होते. सदर पथकाने फिर्यादीकडे सखोल विचारपूस करून त्याने सांगितलेल्या वर्णनावरून पोलीस स्टेशनच्या अभिलेखा वरील व लातूर शहरालगत असलेल्या जिल्ह्यातील अनेक गुन्हेगारांची चाचपणी करण्यात येत होती. दरम्यान दि. ८ नोव्हेंबर २०२३ रोजी पोलीस पथकाला मिळालेल्या विश्वासनीय व गोपनीय माहितीचे विश्लेषण करून सदरची माहिती



बरिष्ठांना कळवून आरोपींना अटक करण्यात आली. लातूर शहरातील जुना औसा रेड परिसरात त्यांनी चोरलेले मोबाईल विकण्याचा प्रयत्न करीत असताना ताब्यात घेऊन विचारपूस केली असता त्यांनी लातूर शहरातील वेगवेगळ्या ठिकाणाहून दोघांनी मिळून मोटर सायकल वरून तसेच पायी जाणा-या इसमाना अडवून त्यांच्याकडील मोबाईल जबरीने लुटले आहे, असे कबूल करून ताब्यातील चोरलेले एकूण १० मोबाईल, गुन्हे करताना वापरलेला एक मोटरसायकल असा एकूण १,६०,०००/- रुपयाचा मुद्देमाल जप्त केला आहे. सदरच्या आरोपी कडून जप्त केलेल्या मुद्देमालावरून पोलीस ठाणे एमआयडीसी येथे जबरी चोरी संदर्भात दाखल असलेला एक गुन्हा उघड झाला असून विविध ठाण्याचे अभिलेखा बस्र लातूर शहरातील विविध पोलीस स्टेशनला दाखल असलेले आणखीन गुन्हे उघड होण्याची शक्यता आहे. गुन्ह्याचा पुढील तपास एमआयडीसी पोलीस ठाण्याचे पोलीस अधिकारी, अमलदार तपास करीत आहेत. सदरची कामगिरी वरिष्ठांचे मार्गदर्शनात व स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांचे नेतृत्वात पोलीस अंमलदार माधव बिलापट्टे, नवनाथ हासबे, राजेश कंचे, मोहन सुरवसे, राजू मस्के, तुराब पठाण, जमीर शेख यांनी केली आहे.

# एका दिवसात सराफ बाजारात तीन कोटींची उलाढाल

लातूर : प्रतिनिधी दीपोत्सवाला सुरवात झाली असून शुक्रवारी धनत्रयोदशीच्या पुर्वसंध्येस ग्राहकांनी सोने-चांदी खरेदीसाठी ग्राहकांनी बाजारात गर्दी केली होती. सराफ दुकानांमध्ये मोठ्याप्रमाणात ग्राहकांची रेलचेल दिसून आली. सोने, चांदीच्या दरात गतवर्षापैक्षा यंदा वाढ झालेली असतांनादेखील मोठ्याप्रमाणात सोने चांदी खरेदीत मोठी उलाढाल झाली. एका दिवसांत जवळपास तीन कोटींचा सराफ बाजारात व्यवहार झाल्याची माहिती सराफ व्यावसायिकांनी दिली.लातूर शहरातील साराफ बाजार धनत्रयोदशीच्या मुर्हूतावर खरेदीसाठी आलेल्या ग्राहकामुळे बाजार फूलूला होता. धनत्रयोदशीच्या मुर्हूतावर ग्राहकांनी सोन्याचांदीचे दागीने खरेदी करण्यासाठी पसंती दिली. त्यामुळे धनत्रयोदशीच्या मुहूर्तावर लातूर बाजारपेठेची कोटयावधी रूपयांची उलाढाल झाली आहे. दिवाळीतील धनत्रयोदशीच्या मुहूर्तावर शुक्रवारी सोने-चांदीचे दागिने खरेदीसाठी शहरातील सराफ दुकानांत ग्राहकांनी सकाळपासूनच गर्दी केली होती. धनत्रयोदशीच्या दिवशी सोने खरेदी करणे खूप शुभ मानले जाते. या दिवशी अनेकजण सोने-चांदी खरेदी करुन घरी आणतात. या दागन्यिांची पूजा केली जाते.यंदा अनेक कर्मचा-यांना दिवाळीचा बोनस आणि वेळेवर वेतन मिळाल्याने निम्या ग्राहकांनी आधीच दिवाळीत दागिने खरेदी केली आहे. दिपावलीच्या सणामध्ये वसूबारस नंतर धनत्रयोदशीच्या दिवशीला महत्व आहे. धनत्रयोदशीच्या दिवशी उत्तम आरोग्यासाठी भगवान धन्वंतरी आणि समृद्धीसाठी कुबेरासह लक्ष्मी गणेशाची पूजा केली जाते. धनत्रयोदशीच्या मुर्हुतावर नागरीकांनी बांगडया, अंगठी, गोल्ड, गळयातील हार आदी सोन्याचे दागीने खरेदी केले. धनत्रयोदशी दिवशी धनाची पूजा केली जाते. सोने हे धातू आहे. गतवर्षाप्रमाने यावर्षीही निर्बंधमुक्त दिवाळी असल्यामुळे नागरीक खरेदीसाठी बाहेर पडले. शहरातील पामांकित शॉपमध्ये सोन्याचे व हि-यांचे दागीने विक्रीसाठी ठेवण्यात आली आहेत. विविध डिजाईनचे तसेच राजस्थानी कलाकुसरीचे दागीने ग्राहकांचे खास आकर्षण ठरत आहेत. या दागीण्यांना ग्राहकांची चांगली मागणी मिळत असल्याचे व्यापारी अनिल अग्रवाल यांनी एकमतशी बोलताना सांगितले.

# राष्ट्रीय बाल दंतरोग परिषदेत एमआयडीएसआर दंत महाविद्यालयातील डॉ. योगेश काळे यांच्या संशोधनास प्रथम पुरस्कार

लातूर, दि. १० - इंडियन सोसायटी ऑफ पिडोडॉन्टीक्स ण्ड प्रिव्हेन्टीव डेन्टीस्ट्री (खड्झझऊ) यांच्या वतीने 'पिडियाट्रीक्स ण्डा प्रिव्हेन्टीव डेंटिस्ट्री' या विषयावर ४४ वी राष्ट्रीय बाल दंत रोग परिषद नुकतीच अहमदाबाद, गुजरात येथे घेण्यात आली. या परिषदेत लातूर येथील एमआयडीएसआर दंत महाविद्यालयातील बाल दंत रोग विभाग प्रमुख डॉ. योगेश काळे यांनी सादर केलेल्या शोध निबंधास प्रथम पुरस्कार मिळाला आहे.राष्ट्रीय बाल दंत रोग परिषदेत डॉ. योगेश काळे यांनी परिषदेच्या पहिल्या सत्रात शिक्षक प्रवर्गात 'सायटॉ टॉक्सीन इफेक्टस ऑफ ईडीटीए ण्ड ईडीटीए मॉडीफाईड बाय सिल्व्हर नॅनो पार्टीकल्स ऑन ह्युमन पेरोडोन्टल लिगामेंट फायब्रो ब्लास्ट' या विषयावर शोधनिबंध सादर केला. या शोध निबंधासाठी डॉ. काळे यांना बेस्ट पेपर अवॉर्ड मिळाला असून प्रमाणपत्र देऊन त्यांचा गौरव करण्यात आल.या परिषदेत एमआयडीएसआर दंत महाविद्यालयातील बाल दंत रोग विभागातील सहयोगी प्राध्यापक डॉ. प्रसन्ना डहाके यांनी शोधनिबंध सादर केला. त्याचबरोबर या विभागातील एम.डी.एस. पदव्युत्तर विद्यार्थी डॉ. निकेता देशमुख, डॉ. पुजा गोपाळघरे, डॉ. समंती गांधी यांनी बाल दंत रोग या विषयावर शोध निबंध सादर केला तर डॉ. उमेश केंद्रे, डॉ. अनुजा भताने, डॉ. पुर्वा बाभुळगावकर व डॉ. सोनाली लिंगायत यांनी पोस्टरचे सादरीकरण करुन परिषदेत सहभाग नोंदवला. तसेच या परिषदेतील वैज्ञातीक सत्रात डॉ. योगेश काळे व डॉ. महेश दडपे यांनी परिक्षक म्हणून काम पाहिले.या यशाबद्दल डॉ. योगेश काळे यांचे एमआयडीएसआर दंत महाविद्यालयाचे कार्यकारी संचालक डॉ. हनुमंत कराड, प्राचार्य डॉ. सुरेश कांगणे, उप प्राचार्य डॉ. यतीशकुमार जोशी यांच्यासह एमआयडीएसआर दंत महाविद्यालयातील डॉक्टर व विद्यार्थ्यांकडून अभिनंदन होत आहे.




# येडियुरप्पा यांचे पुत्र विजयेंद्र यांच्याकडे कर्नाटक भाजपची कमान

नवी दिल्ली : कर्नाटकचे माजी मुख्यमंत्री आणि भाजपचे ज्येष्ठ नेते बीएस येडियुरप्पा यांचे पुत्र बीवाय विजयेंद्र यांच्याकडे कर्नाटक भाजपची कमान सोपवण्यात आली आहे. पक्षाच्या राज्य युनिटच्या अध्यक्षपदी त्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांनी भाजप नेते नलिनकुमार कटील यांची जागा घेतली आहे. विजयेंद्र यांना २०२० मध्ये भाजपच्या कर्नाटक युनिटचे उपाध्यक्ष म्हणून नियुक्त करण्यात आले होते.



भाजपचे राष्ट्रीय सरचिटणीस अरुण सिंह यांनी शुक्रवारी (१० नोव्हेंबर) जारी केलेल्या निवेदनानुसार, भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जेपी नड्डा यांनी आमदार विजयेंद्र येडियुरप्पा यांची कर्नाटक भाजप अध्यक्षपदी नियुक्ती केली आहे. ही नियुक्ती तत्काळ प्रभावाने लागू होणार असल्याचे निवेदनात म्हटले आहे.कर्नाटक भाजपच्या वतीने त्यांचे अभिनंदन करण्यात आले आहे. एका पोस्ट मध्ये कर्नाटक भाजपने म्हटले की, शिकारीपूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार बीवाय विजयेंद्र यांची कर्नाटक भाजप प्रदेशाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे, त्यांचे अभिनंदन. त्यांच्या नेतृत्वाखाली पक्ष राज्यात अधिक संघटित आणि मजबूत होईल.४७ वर्षीय बीवाय विजयेंद्र यांना त्यांचे वडील बीएस येडियुरप्पा यांचे राजकीय उत्तराधिकारी म्हणून पाहिले जाते. भाजपमध्ये एक कुशल संघटनात्मक नेता म्हणूनही विजयेंद्र यांच्याकडे पाहिले जाते. भाजप प्रदेशाध्यक्षपदी त्यांची नियुक्ती झाल्यामुळे अनेक महिन्यांच्या अटकळांना पूर्णविराम मिळाला कारण कर्नाटक निवडणुकीत काँग्रेसचा पराभव झाल्यानंतर भाजप या पदासाठी नवीन अध्यक्ष शोधत होता.

# शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची विद्यार्थ्यांशी सकारात्मक संभाषण शैली असावी शिवशंकरप्पा मल्लिकार्जुनप्पा बिडवे

लातूर :- आज प्रशासनामध्ये विविध प्रकारचे बदल सातत्याने घडून येत आहे. शैक्षणिक क्षेत्रामध्ये शिक्षकासोबत शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. त्यामुळे आपली संभाषण शैली ही सकारात्मक असेल तर संस्था किंवा महाविद्यालयाचा विकास हा गतिमान पद्धतीने घडून येतो असे प्रतिपादन श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष शिवशंकरप्पा मल्लिकार्जुनप्पा बिडवे यांनी केले. श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूर द्वारा संचलित महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात दीपावली २०२३ निमित्त शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी शुभेच्छा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करताना ते बोलत होते. यावेळी विचारमंचावर संस्थेचे जेष्ठ संचालक ॲड. श्रीकांतप्पा उटगे, महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई, उपप्राचार्य डॉ. राजकुमार लखादिवे, उपप्राचार्य प्रा. संजय पवार, उपप्राचार्य प्रा. बालाजी जाधव, पर्यवेक्षक प्रा. शिवशरण हावळे आणि कार्यालय प्रमुख नामदेव बेंदरगे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रारंभी जगतज्योती महात्मा बसवेश्वरांना अभिवादन करून दीप प्रज्वलन करण्यात आले. पुढे बोलताना शिवशंकरप्पा बिडवे म्हणाले की, श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था मी माझे कुटुंब समजतो. आपण सर्वांशी प्रेमाने वागावे. चांगलं काम करणाऱ्या व्यक्तीचा समाजामध्ये सन्मान होणे अत्यंत आवश्यक आहे. व्यक्तीचे कौशल्य आणि शैक्षणिक पात्रता यावरून त्याचे व्यक्तिमत्व ठरते. शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थी आणि पालकांच्या समस्यांचा अभ्यास करून त्या सोडविण्याचा प्रयत्न केला पाहिजे असे सांगून दर सहा महिन्याला एक चिंतन बैठक घेतली पाहिजे असा सल्लाही त्यांनी याप्रसंगी दिला. यावेळी ज्येष्ठ संचालक ॲड. श्रीकांतप्पा उटगे म्हणाले की, आपण सर्वांनी दिवाळीनिमित्त शुभेच्छा कार्यक्रमाचे आयोजन केले त्याबद्दल त्यांनी अभिनंदन करून दिवाळीनिमित्त सर्वांना शुभेच्छा दिल्या. यावेळी प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई म्हणाले की, श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेच्या एकूण १४ युनिटपैकी महात्मा बसवेश्वर महाविद्यालयाबद्दल संस्थेच्या सर्व पदाधिकाऱ्यांना एक वेगळी आपुलकी आणि आत्मीयता आहे याचा आम्हा सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सार्थ अभिमान आहे असे सांगून त्यांनीही सर्वांना दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या. यावेळी उपप्राचार्य प्रा. संजय पवार, नामदेव बेंदरगे, रत्नेश्वर स्वामी आणि यशपाल ढोरमारे यांनीही मनोगते व्यक्त करून शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विनायक लोमटे यांनी केले तर प्रास्ताविक उपप्राचार्य डॉ. राजकुमार लखादिवे यांनी केले तर आभार पर्यवेक्षक प्रा. शिवशरण हावळे यांनी केले. यावेळी प्रा. आशिष क्षीरसागर, टि. घन:श्याम यांच्यासह शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE